जा.क्र.बामुदत-2015/परिपत्रक/ 935
नोंदणी महानिरीक्षक तथा मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे-1
दि. 5 /12/2014.

**विषय :- पड / पोटखराब / डोंगरपड जमिनीच्या मूल्यांकनासाठी विचारात घ्यावयाच्या मूल्य दराबाबत.**

**परिपत्रक :-**

महाराष्ट्र मुद्रांक (मिळकतीचे वास्तव बाजारमूल्य निश्चिती) नियम 1995 मधील तरतूदीनुसार वार्षिक मूल्य दर तक्ते तयार केले जातात.

वार्षिक मूल्य दर तक्त्याची ग्रामीण, प्रभाव व नागरी अशा तीन प्रकारात विभागणी केली जाते. 7/12 उता-यावर पड / पोटखराब म्हणून असलेल्या जमिनी ग्रामीण, प्रभाव व नागरी क्षेत्रात असल्यास त्याचे मूल्य प्रत्येक ठिकाणी वेगळे असते. ग्रामीण भागातील एखाद्या पड जमिनीचे किंमत कमी असते. मात्र नागरी भागात त्याची अकृषिक विकसनक्षमता विचारात घेता मूल्य असते ही बाब विचारात घेता दस्त नोंदणी करताना पड / पोटखराब / डोंगरपड जमिनीच्या मूल्य दराबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

1) नागरी व प्रभाव क्षेत्रात पोटखराब / पड / डोंगरपड जमिनीचे मूल्यांकन संबंधित मूल्य विभागातील दराने (100%) करावे.
2) ग्रामीण क्षेत्रात :-
   i) पोटखराब जमिनीचे मूल्यांकन :- ग्रामीण क्षेत्रातील जमिनीचे हेक्टरी आकार काढताना 7/12 उता-यावरील एकूण आकारास एकूण क्षेत्राने (पड / पोटखराब क्षेत्र न वगळता) भागून (आकार ÷ क्षेत्र) प्रति हेक्टरी आकार काढावा. येणा-या प्रति हेक्टरी आकाराच्या मूल्य दरानुसार व जमिनीच्या प्रकारानुसार (जिरायत / बागायत / फळबागा) पोटखराबासह सर्व क्षेत्र विचारात घेऊन मूल्यांकन करावे.
   ii) डोंगरपड जमिनीचे मूल्यांकन :- ग्रामीण क्षेत्रातील डोंगरपड जमिनीचे मूल्यांकन मार्गदर्शक सूचनानुसार जिरायत जमिनीचे प्रकारानुसार व शेतसाराप्रमाणेच्या मूल्य दराच्या 75% दराने करावे. डोंगरपड जमिनीपैकी काही क्षेत्र जिरायत, हंगामी / बारमाही बागायत असल्याचे 7/12 उताऱ्यावरुन दिसून आल्यास त्याक्षेत्राचे जमिनीच्या प्रकारानुसार व शेतसाऱ्याप्रमाणे दर विचारात घेऊन मूल्यांकन करावे. सदर सूचना इतर पड / पोटखराबासाठी लागू नाही.

उक्त परिपत्रकाची प्रत मा. नोंदणी व मुद्रांक विभागाच्या www.igrmaharashtra.gov.in या संकेतस्थळावर publication या सदराखाली circulars या ठिकाणी उपलब्ध आहे.

सही/-
( श्रीकर परदेशी )
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत माहितीसाठी सादर :-

1) मा.सचिव, (मदत व पुनर्वसन) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-32.
2) मा.महालेखाकार (लेखापरिक्षा) - II, महाराष्ट्र, नागपूर.

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी :-

3) सहनोंदणी महानिरीक्षक, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे.
4) उपसंचालक, नगर रचना, मुंबई प्रदेश मूल्यांकन मुंबई.
5) सहायक संचालक, नगर रचना,मूल्यांकन, कोकण/ पुणे/नाशिक/ औरंगाबाद / अमरावती / नागपूर.
6) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक (मुख्यालय), पुणे.
7) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक (संगणक), पुणे.

    सदर परिपत्रकाची प्रत विभागाच्या संकेतस्थळावर Upload करणेबाबतची कार्यवाही करणेत यावी.

8) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, मुंबई / कोकण / पुणे/नाशिक/ औरंगाबाद / लातूर / अमरावती / नागपूर यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

    -/ सदर परिपत्रकाची प्रत आपले अधिनस्त सर्व नोंदणी कार्यालयांना पुरविणेत यावी. तसेच सदर परिपत्रक त्यांना प्राप्त झाले असून, ते वाचलेबाबत (Read & Acknowledge) त्यांच्या कार्यालयाचा अहवाल प्राप्त करुन घेऊन या कार्यालयास पाठविणेत यावा.

9) सर्व कार्यासन अधिकारी, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय,पुणे.

निर्गमित

नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकरिता

F:\Technical\ASR 2015\paripatrake\Circular-201114\circular